**प्रेसनोट दिनांकः- १२/०४/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.**

**<u>विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीसांकडुन निराधार वृद्ध महिला वृद्धाश्रमात दाखल.</u>**

दिनांक-०६/०४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा चे सुमारास विश्रामबाग पोलीस स्टेशनचे हद्दीत महिला मार्शल म्हणुन कर्तव्यावर असलेल्या मपोशि कु.वैशाली चौघुले, व मपोशि कु.सुनिता फंड यांना उंब-या गणपती चौकामध्ये रस्त्यावर एक वृद्ध महिला आजारी अवस्थेत झोपुन असल्याबाबतची माहिती मिळाली. सदरच्या मिळालेल्या माहितीवरुन महिला मार्शल म्हणुन कर्तव्यावर असलेल्या मपोशि कु.वैशाली चौघुले, व मपोशि कु.सुनिता फंड यांनी तात्काळ उंब-या गणपती चौक येथे जावून खात्री केली असता त्याठिकाणी रस्त्यालगत एक वृद्ध महिला झोपलेली असल्याचे दिसुन आले त्यावेळी महिला मार्शल यांनी लागलीच त्या वृद्ध महिलेस उठवून आस्थेने तिचेबाबत विचारपुस केली असता सदर महिलेचे नाव श्रीमती सुमन भिकु मंचरकर, वय ८१ वर्षे, रा. जनता वसाहत, पर्वती पायथा, पुणे असे असल्याचे व ती निराधार असल्याचे समजुन आले. तसेच तिच्याकडे विचारपुस करीत असतांना ती आजारी असल्याचे व पोटात अन्न नसल्याने भुकेने व्याकुळ होवून तिला अशक्त पणा आल्याचे स्पष्ट दिसत होते. सदर वेळी महिला मार्शल वैशाली चौघुले व सुनिता फंड यांनी जवळच असलेल्या पेरुगेट पोलीस चौकीमध्ये नेवून तेथे तिला नाश्ता व चहा दिला तसेच ती आजारी असल्याने तातडीने तिला ससुन सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे नेवून तिचेवर उपचार करवून घेतले. तद्नंतर मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनिल कलगुटकर यांचे मार्गदर्शनानुसार पुण्यातील वृद्धाश्रमाचे संबंधीतांशी संपर्क साधुन सदर वृद्ध महिलेस महिला मार्शल म्हणुन कर्तव्यावर असलेल्या मपोशि कु.वैशाली चौघुले, व मपोशि कु.सुनिता फंड व पोलीस शिपाई सचिन जगदाळे यांनी लायन दिपक शहा यांचे किनारा वृद्धाश्रम संस्था, कामशेत, जि.पुणे येथे दाखल केले. सदर वेळी पोलीसांनी सदर वृद्ध महिलेच्या केलेल्या सेवेबद्दल पोलीसांप्रती निर्माण झालेली कृतज्ञता सदर वृद्ध महिलेच्या चेह-यावर स्पष्ट दिसत होती.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.